<u>निशाणी ०१ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी <u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये</u> गुन्हयात खाली नमूद असलेला जप्त मुददेमाल परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

| जप्त मुद्देमालाचे वर्णन | |
|---|---|
| वाहन नंबर | MH19-BT7046 |
| चेसीस नंबर | MD625MF50D1G70406 |
| इंजिन नंबर. | DF5GD1364743 |
| मॉडेल | TVS SPORTS |
| कंपनी | TVS. |

वर नमूद वाहन वाहन हे एरंडोल पोलिस स्टेशनमधील गुन्हा रजिस्टर नंबर गु.र.नं.१३९/२०२२ भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये दाखल गुन्हयात जप्त करण्यात आलेले आहे. अर्जदाराच्या अर्जानुसार सदरचे वाहन हे त्यास वापराकरिता हवा असून सदरचे वाहन पोलिस ठाण्यात पडून राहिल्यास अर्जदाराचे नुकसान होणार आहे.

२. एरंडोल पोलिस स्टेशन यांचेवतीने तपास अधिकारी यांनी नि.क्र.६ कडे म्हणणे दाखल केले. त्यांनी त्यांचे म्हणण्यात कथन केले आहे की, वर नमूद मुद्देमाल हा सदर गुन्हयात जप्त करण्यात आला असून तो अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्ती अन्वये देण्यास आमची काहीएक हरकत नाही. फिर्यादी यांनी निशाणी ७ कडे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याचे कळविले.

३. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल केले. त्यांनी त्यांचे म्हणण्यात कथन केले आहे की, वर नमूद मुद्देमाल हा सदर गुन्हयात जप्त करण्यात आला असून तो अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्ती अन्वये देण्यास आमची काहीएक हरकत नाही.

४. अर्जदाराच्या वतीने विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांचे न्यायालयास सांगणे की, सदरची मोटर सायकल ही अर्जदार यांच्या मालकीची आहे. सदरची मोटरसायकल पोलिस ठाण्यात पडून राहिल्यास खराब होउ शकते. अर्जदार याच्या वैयक्तीक वापरासाठी सदरची मोटर सायकल त्यास हवी आहे. मा. न्यायालय आदेश करेल त्या त्या वेळी सदरची मोटर सायकल हजर ठेवण्याची अर्जदार हमी देत आहे.

५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. वळवी यांनी युक्तीवाद केला की, वर नमूद मुद्देमाल हा सदर गुन्हयात जप्त करण्यात आला असून तो अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्ती अन्वये देण्यास आमची काहीएक हरकत नाही.

६. अर्ज, त्यासोबत जोडलेले दस्तऐवज, म्हणणे तसेच युक्तीवाद विचारात घेतला. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी गुन्हयातील जप्त मोटरसायकल मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदरच्या मोटरसायकलवर अर्जदार यांनीच दावा केलेला आहे. प्रस्तुत गुन्हयाची संपरिक्षा ही या न्यायालयासमक्ष चालविली जाणार आहे. सदरची मोटर सायकल पोलिस ठाण्यात जप्त

ठेवण्याचे कोणतेही न्यायोचित कारण दिसून येत नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ प्रमाणे सदर मोटर सायकलचा ताबा अर्जदारास तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे. संपरीक्षेदरम्यान सदरची मोटर सायकल ही या न्यायालयात हजर करण्याचे आदेश हे न्यायालय देउ शकते. प्रथमदर्शनी सदरची मोटर सायकल ही अर्जदार यांच्या मालकीची असल्याचे दिसून येत असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

आ दे श

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | जप्त मोटरसायकल क्र. MH19-BT7046 ही हस्तांतर, विक्री न करण्याच्या रक्कम रु.३०,०००/- रुपयांच्या हमीचे बंधपत्र रु.२००/-च्या स्टॅम्पपेपरवर लिहून दिल्यानंतर अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात यावी. |
| ३ | या न्यायालयाच्या परवानगीशिवाय अर्जदार यांनी जप्त मोटर सायकल मध्ये कोणताही फेरबदल करु नये, त्याचा रंग बदलू नये, त्याचे स्वरुप बदलू नये. तसेच विक्री किंवा गहाण ठेवू नये. |
| ४ | हे न्यायालय आदेश करेल त्या वेळी अर्जदार यांनी सदरची मोटर सायकल या न्यायालयात हजर करावयाची आहे. |
| ५ | अर्जदार यांनी स्वखर्चाने मोटर सायकलच्या चारही बाजूचे फोटो काढून ते तपास अधिकारी यांना दयावयाचे आहे. |
| ६ | वरील सर्व अटींची पुर्तता केल्यानंतर जप्त मोटर सायकल तपास अधिकारी यांनी अर्जदार यास योग्य तो पंचनामा करुन परत दयावी. |
| ७ | संबंधीत पोलिस स्टेशनला पत्र पाठवावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2022.11.07 17:04:45 +0530

दिनांक – ०७/११/२०२२ (विशाल श्रावण धोंडगे )

ठिकाण – एरंडोल प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी